
एक छोटा
कावळा मुलगा.




तारो याशिमा.
हिंदी अनुवाद- अरविंद गुप्ता.
स्वैर मराठी अनुवाद- फारुक एस. काझी



जपानमधल्या आमच्या गावातल्या शाळेत, पहिल्याच दिवशी एक मुलगा गायब झाला होता. नंतर तो शाळेच्या तळघरात लपून बसलेला आढळला.

आमच्यापैकी त्याला कुणीच ओळखत नव्हतं. त्याची उंची खूपच कमी होती. म्हणून आम्ही सगळे त्याला ‘चिबी’ म्हणायचो. ‘चिबी’ म्हणजे ‘लहान किंवा छोटा मुलगा’.




तो विचित्र मुलगा आमच्या शिक्षकांना खूप घाबरायचा. त्यामुळे तो काहीच शिकू शकला नाही. तो इतर मुलांनाही घाबरायचा. त्यामुळे त्याची कुणाशीच मैत्री झाली नाही.




आम्ही अभ्यास करताना तो एकटाच असायचा.



आम्ही
खेळतानाही
तो
एकटाच
बसलेला
असायचा.



मुलांच्या
रांगेत तो
सर्वांत मागे
उभा
असायचा.
कुणाच्यात
मिसळायचा
नाही की
कुणासोबत
खेळायचा
नाही.



त्याने डोळे
ताणणं शिकून
घेतलं होतं.



त्यामुळे तो
त्याला
पाहिजे तेच
पाहायचा.
बाकी इतर
कुठे त्याचं
लक्षच
नसायचं.



चिबीने वेळ घालवण्यासाठी कितीतरी गोष्टी शोधून काढल्या होत्या.




तो वर्गातल्या छताकडे तासंतास बघत राही. छत ही त्याची खास आवडीची जागा झाली होती जणू!




स्वतःच्या डेस्ककडे बघत राहणे त्याला आवडायचं.




एखाद्या मुलाने घातलेल्या शर्टवरची डिझाईन
पाहण्यात तो हरवून जायचा.




खिडकीच्या बाहेरचं जग त्याला स्वतःकडे ओढून घ्यायचं.
खिडकीच्या बाहेर तर पाहायला वर्षभर पुरतील एवढ्या
गोष्टी होत्या.



पावसाळ्यात त्याला कितीतरी अद्भुत गोष्टी
खिडकीतून दिसायच्या.




खेळाच्या मैदानावर चिबी आपले डोळे मिटून घेई
आणि जवळपासचे, दूरचे कित्येक आवाज ऐकत राही.



तो अळया आणि किड्यांचं निरीक्षण करी आणि त्यांना पकडत असे. इतर मुलं तर त्यांच्याकडे ढुंकूनही बघत नव्हती.




म्हणून आमच्याच वर्गातील नव्हे तर शाळेतील इतर मुलंही त्याला बावळट आणि मूर्ख म्हणायची. चिडवायची. त्रास द्यायची.




चिबी दररोज
चालत शाळेत
यायचा. त्याच्या
डब्यात एकच मेनू
असायचा-
मुळ्याच्या पानांत
बांधलेला भाताचा
गोळा.



वादळ-वारं असो
की मुसळदार
पाऊस, चिबी
कधीच शाळा
बुडवत नसे.
पावसात तो
वाळलेल्या झेब्रा
गवताचा रेनकोट
पांघरून येत असे.



हळूहळू अशीच पाच वर्षे निघून गेली. आम्ही सहाव्या इयत्तेत पोचलो. हा आमच्या शाळेतला सर्वात शेवटचा वर्ग होता.



आम्हाला एक नवीन शिक्षक आले होते- इसोबे सर. ते नेहमी हसतमुख असायचे. ते खूपच मनमिळावू स्वभावाचे होते. सर्वांशी मैत्रीपूर्ण वागायचे.



इसोबे सर आपला वर्ग नेहमी शाळेच्या पाठीमागच्या टेकडीवर घेऊन जायचे.





चिबीला अशा जागा पक्क्या ठाऊक होत्या जिथं जंगली द्राक्षे आणि जंगली बटाटे सापडायचे. इसोबे सरांना जेव्हा हे समजलं तेव्हा ते खूप खुश झाले.



शाळेच्या बागेतील फुलांविषयी चिबीला असलेली माहिती पाहून तर ते थक्कच झाले!



चिबीने काढलेली काळी-पांढरी चित्रेही त्यांना खूप आवडली. ती त्यांनी वर्गात टांगून ठेवली.



चिबी जे काही लिहायचा, ते फक्त आणि फक्त त्यालाच वाचता यायचे. पण इसोबे सरांना त्याचं लेखन इतकं आवडलं की त्यांनी ते वर्गात लावलं.



वर्गात
जेव्हा मुलं
नसायची
तेव्हा ते
चिबीशी
खूप गप्पा
मारत
असत.



वार्षिक स्नेहसंमेलनात जेव्हा चिबी रंगमंचावर दिसला तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. “तो कोण आहे?”, “अरे, हा बावळट तिथं काय करतोय?” आणि मग इसोबे सरांनी घोषणा केली, “आता चिबी आपल्यासमोर कावळ्यांचे आवाज काढून दाखवेल.”


“आवाज?” “कावळ्यांचे आवाज?” “कावळ्यांचे आवाज?”



“कावळ्यांचे आवाज.”



सर्वात आधी चिबीने कावळ्याच्या नवजात पिल्लाचा आवाज काढला.



नंतर त्याने आई कावळ्याचा आवाज काढला.





मग त्याने वडील कावळ्याचा आवाज काढला.



सकाळी सकाळी कावळे कसा आवाज काढतात हे त्याने दाखवले.



गावात जर एखादी वाईट घटना घडलेली असेल, लोक दुःखी असतील तर कावळे कसा आवाज काढतात, हे ही त्याने दाखवले.



आणि कावळे जेव्हा खूप आनंदात आणि मस्तीत असतात तेव्हा कसे ओरडतात, हे ही दाखवले.



त्यानंतर प्रत्येकाच्या डोळ्यासमोर चिबी ज्या डोंगरदऱ्यांना पार करून शाळेत येत होता, तो दुर्गम भाग दिसू लागला.



शेवटी त्याने जुन्या-पुराण्या झाडाच्या फांदीवर बसून ओरडणाऱ्या कावळ्याचा आवाज काढला. हा आवाज त्याने खोल कंठातून काढला – "काऊवात्त! काऊवात्त!"



चिबीने हे सर्व आवाज कसे शिकून घेतले हे इसोबे सरांनी आम्हाला सांगितले. चिबी शाळेसाठी सकाळी सकाळी लवकरच घरातून बाहेर पडत असे.



आणि सूर्य मावळल्यानंतरच घरी परतत असे.



गेली सहा वर्षे त्याचा हाच दिनक्रम होता.



हे सर्व ऐकून आमच्यापैकी प्रत्येकजण रडला. कारण इतकी वर्षे आम्ही त्याला खूप त्रास दिला होता. छळलं होतं. आम्ही खूप चुका केल्या होत्या.



मोठ्यांनीही आपले डोळे पुसले आणि म्हणाले, “हा खरंच अद्भुत आहे!”



चिबी वर्गातील एकमेव असा विद्यार्थी होता ज्याचा शंभर टक्के हजेरीसाठी सन्मान केला गेला.



शाळा संपल्यावर मोठी मुलं आपापल्या घरच्या कामानिमित्त गावात येत असत.





चिबीही असाच आपल्या कुटुंबाने तयार केलेला कोळसा विकायला गावात येत असे.




पण, आता त्याला कुणीही ‘चिबी’ नावाने हाक मारत नसे. आता सगळेजण त्याला ‘कावळा मुलगा’ याच नावाने बोलावत.



हे नाव ऐकून तो मान हलवून हसत असे. जणू त्याला त्याचं हे नाव आवडलं असावं.



आपलं काम संपवून तो आपल्या कुटुंबासाठी काही वस्तू खरेदी करत असे.



आणि मग एखाद्या मोठ्या माणसासारखा छाती काढून डोंगरांच्या पलीकडे वसलेल्या आपल्या गावाकडे चालू लागत असे.

आणि डोंगरवाटेच्या वळणावर एका कावळ्याचा आवाज गुंजत असे... **आनंदाने भरलेला!**